**प्रतिवादी क्र. १ तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुढील सरतपास प्रतिवादी क्र. १ चे वकिल श्री. जी.एल.इंगोले यांचे मार्फत.**

१०. प्रश्न — न्यायालयामार्फत प्रश्न तुम्ही शासकिय अधिकारी म्हणुन साक्ष देत आहात त्यामुळे तुम्ही सरकारी वकील यांचे मार्फत हे प्रकरण का चालवित नाही आहे ?
उत्तर — मी या प्रकरणात माइया वरीष्ठांच्या आदेशान्वये निशाणी १०७ हा श्री जी.एल.इंगोले वकील यांचा वकालातनामा दाखल करून श्री जी.एल.इंगोले वकील यांना माझे विभागाचे खाजगी वकील म्हणुन या प्रकरणात नियुक्त केले आहेत.

११. मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे.

१२. मी या प्रकरणात निशाणी २१ या कागदपत्रांच्या यादीसोबत अ.क्र. ६ ला कार्यारंभ आदेशाची पडताळणीकृत प्रत दाखल केली आहे. त्यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी ११६** देण्यात येते. तसेच सदर कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र.१४ ला दिनांक २५.०५.२००४ रोजीचा पशुसंवर्धन विभागाचा शासन निर्णय दाखल केला आहे. त्यास **निशाणी ११७** देण्यात येते.

१३. तसेच मी निशाणी ११५ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. १ ला दिनांक १०.०६.२०२४ रोजीच्या प्रथम खबरी अहवालाची सत्यप्रत दाखल केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी ११८** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. २ ला मालमत्तापत्रकाची सत्यप्रत दाखल केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी ११९** देण्यात येते.
**सरतपास संपला.**

**वादीच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरून प्रकरण शेवटची संधी म्हणुन उलटतपासाठी तहकुब.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दि. ०५.१२.२०२४.

( महेश एस. काळे )
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**